दिनांक 05/12/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.142

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना, नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना, लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अनुदान निधीतून विविध विकास कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 05/12/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2)मा.जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2024-2025 करिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यतय पत्र क्र.नवि/कार्या-4/कावि-236/2024 दि.24/06/2024.

3)मा.जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2024-2025 करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यय पत्र क्र.नवि/कार्या-4/कावि-233/2024 दि.24/06/2024.

4) मा.जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2024-2025 करिता नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यरय पत्र क्र.नवि/कार्या-4/कावि-234/2024 दि.24/06/2024.

5) मा.गोपीचंद पडळकर आमदार महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडील जावक क्र.714/2023 दि.21/11/2023 रोजीचे पत्र.

6) मा..ॲड् वैभव सदाशिवराव पाटील अध्यक्ष सांगली जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी यांचेकडील पत्र.

7) मा.अनिल मनोहर बाबर मा.अध्यक्ष भा.ज.पा. विटा शहर यांचेकडील पत्र.

विटा नगरपरिषद हद्दीतील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना, नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना, लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत खालील कामे प्रस्तावित करणेत आलेली आहेत.

तरी सदरची कामे ही खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील किसन चौगुले घर ते नाथा चव्हाण घरापर्यंत अंडरग्राउंड गटर करणे. (प्रभाग क्र. 03)
2. विटा नगरपरिषद हद्दीतील नाथा चव्हाण घराजवळ अंडरग्राउंड गटर करणे व रस्ता ट्रिमिक्स कॉंक्रिटीकरण करणे. (प्रभाग क्र. 03)

पान नं.2 वर

3. विटा नगरपरिषद हद्दीतील समीर मुल्ला घर ते ओढ्यापर्यंत अंडरग्राउंड गटर करणे. (प्रभाग क्र. 03)
4. विटा नगरपरिषद हद्दीतील भवानीमाळ येथील नंदू पवार ते विजय कदम ते ओढयापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 07)
5. विटा नगरपरिषद हद्दीतील ऑइल मिल रस्ता ते कुंभार साहेब घरापर्यंत आर.सी.सी गटर करणे ( दोन्ही बाजूस). (प्रभाग क्र. 03)
6. विटा नगरपरिषद हद्दीतील निलेश मंडले घराजवळ अंडरग्राउंड गटर करणे व रस्ता ट्रिमिक्स काँक्रिटीकरण करणे. (प्रभाग क्र. 03)
7. विटा नगरपरिषद हद्दीतील गांधीनगर येथे सागर कुपाडे घर ते संदीप मुळीक घर ते विश्वकर्मा मंदिर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र.12)
8. विटा नगरपरिषद हद्दीतील सुळेवाडी येथील मारुती मंदिर ते मनोहर सुळे शेड पर्यंतचा रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे व सी.डी. वर्क बांधणे. (प्रभाग क्र. 04)
9. विटा नगरपरिषद हद्दीतील यशवंतनगर मधील आत्माराम जगताप घर ते देशमुख घरापर्यंतचा रस्ता सेमीडेन्स कारपेट करणे. (प्रभाग क्र. 06)
10. विटा नगरपरिषद हद्दीतील यशवंतनगर येथे 450 ले आऊट मधील रस्ता क्रमांक 4 येथे आर.सी.सी गटर करणे. (प्रभाग क्र. 06)
11. विटा नगरपरिषद हद्दीतील श्रीनगर येथील जनार्दन शितोळे विहीर ते रंगराव सूर्यवंशी घरापर्यंत रस्ता ट्रिमिक्स काँक्रिटीकरण करणे. (प्रभाग क्र. 09)
12. विटा नगरपरिषद हद्दीतील फुलेनगर मध्ये महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्देशीय हॉल नूतनीकरण करणे. (प्रभाग क्र. 09)
13. विटा नगरपरिषद हद्दीतील सुरेश मंडले घर ते चव्हाण मॅडम घरापर्यंत अंडरग्राउंड गटर करणे व रस्ता डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 03)
14. विटा नगरपरिषद हद्दीतील विवेकानंदनगर मधील विशाल गायकवाड घर ते आमंत्रण ढाबा पर्यंत बंदिस्त गटर व रस्ता करणे. (प्रभाग क्र. 10)
15. विटा नगरपरिषद हद्दीतील धनाजी घाडगे घराजवळ अंडरग्राउंड गटर करणे व रस्ता ट्रिमिक्स काँक्रिटीकरण करणे.
16. विटा नगरपरिषद हद्दीतील आबा लोहार घर ते गणेश कारंडे घरापर्यंत अंडरग्राउंड गटर करणे. (प्रभाग क्र. 03)
17. विटा नगरपरिषद हद्दीतील जुना वासुंबे रस्ता ते जीवन चोथे घरापर्यंतचा रस्ता ट्रिमिक्स काँक्रिटीकरण करणे. (प्रभाग क्र. 03)
18. विटा नगरपरिषद हद्दीतील संभाजीनगर नेवरी रोड येथील नरेंद्र सावंत घर ते बापू लोटके घर एक साईड आर.सी.सी गटर करणे व गटरवर स्लॅब टाकणे. (प्रभाग क्र. 08)
19. विटा नगरपरिषद हद्दीतील भैरवनाथनगर विटा हायस्कूल मागील भागातील अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करून पेव्हिंग ब्लॉक बसविणे. (प्रभाग क्र. 10)
20. विटा नगरपरिषद हद्दीतील मरीमी मंदिर ते शरद रोकडे कॉम्प्लेक्स पर्यंत आर.सी.सी गटर करणे. (प्रभाग क्र. 10)
21. विटा नगरपरिषद हद्दीतील शरद रोकडे कॉम्प्लेक्स ते नाना पाटील पुतळयापर्यंत आर.सी.सी गटर करणे. (प्रभाग क्र. 10)

पान नं.3 वर

22. विटा नगरपरिषद हद्दीतील मनमथ मंदिर ते राजेंद्र चिरमे घरापर्यंत दोन्ही बाजूस आर.सी.सी गटर करणे. (प्रभाग क्र. 11)
23. विटा नगरपरिषद हद्दीतील संभाजीनगर नेवरी रोड येथील महादेव तांदळे घर ते व्यंकटेश कॉलनी पर्यंत एक साईड आर.सी.सी गटर करणे व गटरवर स्लॅब टाकणे. (प्रभाग क्र. 08)
24. विटा नगरपरिषद हद्दीतील कराड रोड येथील बापूराव गायकवाड घर ते मनमंदिर दूध डेअरी पर्यंत रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 08)
25. विटा नगरपरिषद हद्दीतील विवेकानंदनगर येथील दत्त मंदिर ते नामदेव मंदिर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 10)
26. विटा नगरपरिषद हद्दीतील जुना वासुबे रोड ते ओढयापात्रा पर्यंत एका बाजूस आर.सी.सी गटर करणे. (प्रभाग क्र. 03)
27. विटा नगरपरिषद हद्दीतील साळशिंगे नाका ते अतुल तारळेकर घर जुने गटर काढून नवीन आर.सी.सी गटर करणे. (प्रभाग क्र. 02)
28. विटा नगरपरिषद हद्दीतील साळशिंग रस्ता येथील यशोदानगर बोर्ड ते मोमीन घरापर्यंत रस्ता मुरमीकरण, खडीकरण, डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 02)
29. विटा नगरपरिषद हद्दीतील साळशिंगे रोड साई कापड दुकान रोड दोन्ही साईडची जुनी गटर काढून नवीन आर.सी.सी गटर करणे. (प्रभाग क्र. 06)
30. विटा नगरपरिषद हद्दीतील नेहरूनगर मधील नागेश भिंगारदेवे घर ते रामचंद्र तुपे ते प्रसाद भिसे ते संजय भिंगारदेवे घरापर्यंत अंडरग्राउंड गटर करणे. (प्रभाग क्र. 05)
31. विटा नगरपरिषद हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर येथे बुद्ध हस्तमुद्रा ते उत्तम कांबळे घरापर्यंतचा रस्ता रुंदीकरण करून डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 11)
32. विटा नगरपरिषद हद्दीतील विवेकानंदनगर मधील नामदेव मंदिर ते ओढ्यापर्यंत बंदिस्त गटर करणे. (प्रभाग क्र. 10)

तरी वरील कामांस महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना (जिल्हास्तर), नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना, लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अनुदान सन 2024-2025 मधील जिल्हा वार्षिक योजना निधीतून घेणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

तसेच सदर कामांपैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत अनुदान मंजूरीकरीता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.: नगरो-2015/प्र.क्र.232/नवि-33 मंत्रालय, मुंबई – 400032 दि. 16/05/2016 नुसार खालीलप्रमाणे सुधारणात्मक कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे .

पान नं.4 वर

1. नगरपरिषदेमध्ये व्दिनोंद लेखा पध्दतीचा अवलंब करणे.
2. नगरपरिषदेच्या कामकाजाचे पूर्ण संगणकीकरण करणे.
3. मालमत्ता कर विषयक विविध प्रकारच्या सुधारणा करणे.
4. नगरपरिषद हद्दीमध्ये पर्जन्य जल संचय (Rain Water Harvesting) करणे.
5. नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या( उपाययोजना राबविणे).

   उपरोक्त प्रमाणे सुधारणात्मक कार्यक्रम राबविणेस या ठरावाद्वारे मान्यता देणेत येत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 05/12/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.143

विषय – स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या एकूण रकमेतील नगरपरिषदेचा हिस्सा व Additional Cost प्रोत्साहनात्मक बक्षीस रकमेतून अदा करावयाचा प्रस्ताव प्रशासकिय मान्यतेकामी मंजुरीसाठी पाठविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरीक्षक यांची दिनांक 04/12/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा.राज्य अभियान संचालक, स्वच्छ भारत मिशन यांचेकडील आदेश, MUDM/SMM/1410/2022-23, 24/02/2023.

3) विटा नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्र.155, दि.21/03/2023.

4) समर्थ इंजिनिअर्स,पुणे यांना दिलेला कार्यादेश जा.क्र.4302, दि.21/03/2024.

5) समर्थ इंजिनिअर्स,पुणे यांनी आवक क्र.5496, दि.18/12/2023 अन्वये सादर केलेला सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)

6) मा.अधीक्षक अभियंता (प्र), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,सांगली यांचे पत्र जा.प.क्र.तांशा-3/विटा न.प./तां.मं/97/2024, दि.10/01/2024.

7) विटा नगरपरिषदेचे पत्र जावक क्र.2929, दि.15/01/2024.

8) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.स्वमअ-2024/CN820394(91)/नवि-34,दि.14/08/2024.

9) नगर विकास विभाग,शासन शुद्दीपत्रक,क्रमांक:स्वमअ-2022/प्रा.क्र.94/ नवि-34,दि.18/09/2024.

संदर्भ क्र.2 नुसार, स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 या अभियानांतर्गत मंजूर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यासाठी संस्थांची विभागनिहाय नामिकासूची (Empanelmemnt) तयार करण्यात आली आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर नामिकासूचीतील संस्थांकडून घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेणेबाबत सूचना प्राप्त आहेत.

त्यानुसार संदर्भ क्र.3 अन्वये स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषद विटा करिता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करणेकामी समर्थ इंजिनिअर्स, पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत प्रशासकीय ठराव करणेत आला होता.

त्यानुसार संदर्भ क्र.4 अन्वये समर्थ इंजिनिअर्स, पुणे यांना मंजूर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करणेबाबत आदेश देण्यात आला होता.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.5 अन्वये समर्थ इंजिनिअर्स, पुणे यांनी सदर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रक व नकाशे सादर केले होते.

पान नं.2 वर

संदर्भ क्र.6 नुसार सदर प्रकल्प अहवालास मा. अधीक्षक अभियंता (प्र), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,सांगली यांची एकूण र.रु.4,30,25,499/- एवढ्या रकमेची तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली होती.

संदर्भ क्र.7 नुसार मा.अधीक्षक अभियंता (प्र), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,सांगली यांचेकडून र.रु.4,30,25,499/- एवढ्या रकमेची तांत्रिक मंजुरी मिळालेला प्रस्ताव मा.राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना), मुंबई यांचेकडे प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सादर करणेत आला होता.

संदर्भ क्र.8 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दि.23/07/2024 रोजीच्या 12 व्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरून खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार काही अटी व शर्तींचा अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

| Sr No | Category | Approved CSAP | | Approved Proposal | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Qty (TPD) | Amount (Rs.) | Qty (TPD) | Total Cost (Rs.) | Central Share (Rs.) | State Share (Rs.) | ULB Share (Rs.) | Additional Cost / (Savings) (Rs.) |
| १ | Wet Waste Plant - Compost (@ Rs.११.५ lakh/TPD) | 8.00 | 92,00,000 | 11.21 | 2,58,50,638 | 46,00,000 | 36,80,000 | 9,20,000 | 1,66,50,638 |
| २ | Dry Waste Plant - MPF (@ Rs.८.५ lakh/TPD) | 8.00 | 59,50,000 | 10.22 | 92,62,613 | 29,75,000 | 23,80,000 | 5,95,000 | 33,12,613 |
| ३ | Scientific Landfill (@ Rs.६.५ lakh/TPD) | 2.04 | 13,26,000 | 2.57 | 52,87,594 | 6,63,000 | 5,30,400 | 1,32,600 | 39,61,594 |
| | Total | - | 1,64,76,000 | - | 4,04,00,845 | ८२,३८,००० | 65,90,४०० | 16,47,600 | 2,39,24,845 |

वरील तक्त्यात नमूद केलेप्रमाने एकुण र.रु.4,04,00,845/- एवढ्या रकमेच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

प्राप्त प्रशासकीय मान्यतेच्या रकमेपैकी नगर परिषदेचा हिस्सा र.रु.16,47,600/- आहे व प्रशासकीय मंजुरीत नमूद केलेप्रमाणे प्रकल्पाची Additional Cost - र.रु.2,39,24,845/- एवढी आहे. सदर दोन गोष्टी मिळून एकूण र.रु.2,55,72,445/- एवढी होत आहे. सदर रक्कम नगरपरिषदेस स्वनिधीतून भरणे शक्य होणार नाही.

विटा नगरपरिषदेने स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा या अभियानामध्ये राज्य तसेच देश पातळीवर उत्कृष्ट काम केल्याने तसेच नगरपरिषदेने सदर अभियानांमध्ये राज्य व देश पातळीवर क्रमांक मिळवल्यामुळे नगरपरिषदेस विविध बक्षिसे प्राप्त झाली आहे.

पान नं.3 वर

संदर्भ क्र.8 नुसार स्वच्छ सर्वेक्षण मध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या बक्षिसाच्या विनियोगाची कार्यपद्धती नमूद करण्यात आली आहे. त्यानुसार विटा नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या एकूण रकमेतील नगरपरिषदेचा हिस्सा र.रु.16,47,600/- व Additional Cost र.रु.2,39,24,845/- असे एकूण र.रु.2,55,72,445/- हे नगरपरिषदेस प्राप्त प्रोत्साहनात्मक बक्षीस रकमेतून अदा करणेस प्रशासकिय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.राज्य अभियान संचालक, स्वच्छ भारत अभियान, मुंबई यांचेकडे सादर करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा